MHRG040003812026

**दिवाणी चौकशी अर्ज क्र. २२८/२०२६**

**श्रीमती प्रमिला रमेश वाघचौरे व इतर ३ –** अर्जदार

विरुध्द

कोणीही नाही.

## निशाणी क्रमांक ०१ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज मुंबई रेग्युलेशन VIII, १८२७ अन्वये वारस दाखला मिळणेकरीता ई–फाईलिंगद्वारे दाखल केला आहे.

०२) अर्जातील कथन असे की, **कै. रमेश धोंडू वाघचौरे** हे दिनांक २०/०४/२०२४ रोजी मयत झाले आहेत. मयत **कै. रमेश धोंडू वाघचौरे** यांची अर्जदार क्र. १ ही पत्नी आहे, अर्जदार क्र. २ ते ४ ह्या मुली आहेत व अर्जदार क्र. ५ हा मुलगा आहे. तसेच त्यांच्या आई कै. जानकीबाई धोंडू वाघचौरे यांचे दि. १७/०४/२००२ रोजी निधन झालेले आहे व त्यांचे वडील कै. धोंडू गेनू वाघचौरे यांचे दि. १८/०६/१९९९ रोजी निधन झालेले आहे.

०३) अर्जदाराचे व्यतिरिक्त मयत **कै. रमेश धोंडू वाघचौरे** यांस अन्य कोणीही वारस नाहीत. अर्जदाराने अन्य कोणत्याही कोर्टात अशा प्रकारचा वारस दाखला मिळण्याकरीता अर्ज केलेला नाही.

०४) मयत **कै. रमेश धोंडू वाघचौरे** यांच्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे आहे.

| **मिळकतींचे वर्णन** |
|---|
| फ्लॅट नं. २०१, सिध्दीविनायक पॅराडाईज, प्लॉट नं. ८०, सेक्टर १८, उलवे, ता. पनवेल, जि. रायगड. |

०५) तसेच, जाहिरनामा **(नि. क्र. ६)** प्रमाणे माहे एप्रिल २०२६ आणि दैनिक ''रायगड नगरी'' मध्ये दिनांक ०८/०४/२०२६ रोजी जाहीर नोटीस **(निशाणी क्र. २२)** दिल्यानंतर ३० दिवसांचे आत कुणीही हरकत घेतलेली नाही.

०६) **अर्जदारांनी दाखल केलेली कागदपत्रे खालीलप्रमाणे–**

| **अनु.क्र.** | **कागदपत्रे** | **निशाणी क्र.** |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र. ५ यांचे पुराव्याचे शपथपत्र | १० |
| २. | मयत **कै. रमेश धोंडू वाघचौरे** यांच्या मृत्यू दाखल्याची प्रत | १६ |
| ३. | कै. जानकीबाई धोंडू वाघचौरे यांच्या मृत्यू दाखल्याची प्रत | १७ |
| ४. | कै. धोडू गेनू वाघचौरे यांच्या मृत्यु दाखल्याची प्रत. | १८ |
| ५. | अर्जामध्ये नमुद सदनिका मिळकतीच्या नोंदणीकृत करारनाम्याची पडताळलेली प्रत. | १९ |
| ६. | अर्जदार क्र. १ ते ५ यांच्या आधारकार्डच्या पडताळलेल्या प्रती. | ११ ते १५ |
| ७. | पुरावा बंदची पुरशीस | २३ |

०७) सदर परिच्छेद क्र. ३ मधील नमुद तोंडी व कागदोपत्री पुराव्यावरून असे दिसुन येते की मयत **कै. रमेश धोंडू वाघचौरे** हे दि. २०/०४/२०२४ रोजी मृत्यू पावलेले आहेत व अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत. मयत **कै. रमेश धोंडू**

**वाघचौरे** यांच्या मालकीची अर्जातील परिच्छेद क्र. ३ मध्ये वर्णन केलेली मिळकत असल्याचे दिसुन येते.

०८)  १८२७ च्या मुंबई नियमन VIII च्या कलम ७ मध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, प्रमाणपत्र मालमत्तेवर कोणताही अधिकार देत नाही. परंतु, केवळ त्या व्यक्तीला सूचित करते जी सध्या तिच्या कायदेशीर व्यवस्थापनात आहे, असे प्रमाणपत्र देण्यामुळे कोणत्याही व्यक्तीचा अधिकार अंतिमत: निश्चित होणार नाही किंवा त्याला हानी पोहोचणार नाही. १८२७ च्या मुंबई नियमन VIII अंतर्गत, न्यायालयाला फक्त हे विचारात घेणे आवश्यक आहे की वारस प्रमाणपत्राचा दावा करणारी व्यक्ती मृताचा वारस आहे की नाही आणि औपचारिकपणे त्याला मृताचा वारस म्हणून मान्यता देते.

०९)  वरील सर्व बाबींचे विवेचन केल्यानंतर असे स्पष्ट होते की, अर्जदार हे मयत **कै. रमेश धोंडू वाघचौरे** यांचे कायदेशीर वारस असून सदर अर्जाला अन्य कोणीही हरकत घेतलेली नाही, त्यामुळे अर्जदार यांचेवर अविश्वास ठेवण्याचे कोणतेही कारण नाही. अर्जदार यांचा पुरावा विनाआव्हानात्मक आहे. म्हणुन, अर्ज मंजुर करुन मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## :: आदेश ::

| | |
|---|---|
| ०१ | अर्ज अंशत: मंजूर करण्यात येत आहे. |
| ०२ | अर्जदार हे मयत **कै. रमेश धोंडू वाघचौरे** यांचे कायदेशीर वारस असून त्यांच्या नावे वारस दाखला मिळकतीच्या चालू प्रचलित बाजारमुल्यावर |

| | |
|---|---|
| | आवश्यक तो मुद्रांक शुल्क दिल्यावर देण्यात यावा. |
| ०३ | अर्जदार यांनी मुद्रांक शुल्क महाराष्ट्र कोर्ट फी ॲक्टचे शेडयुल्ड एक मधील आर्टीकल १२ सह आर्टीकल १० अन्वये ३० दिवसांची आत भरावी. |

VAISHALI RAJENDRA HANGARGEKAR

Digitally signed by VAISHALI RAJENDRA HANGARGEKAR
Date: 2026.08.01 17:36:25 +0530

पनवेल. (व्ही. आर. हंगरगेकर)

दिनांक – ०१/०८/२०२६ सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, पनवेल.